नियमित फौजदारी खटला क्र.५७३/२००२
महा.शासन वि.संजय अग्रवाल व इतर.
नि.क्र.१
CNR No.MHWR030003432002

**<u>आदेश नि.क्र.१ वर.</u>**
**<u>(दि.२३.०७.२०२६)</u>**

सदर प्रकरण पुराव्यासाठी असून तपास अधिकारी श्री.एस.जी.देशपांडे, वय वर्ष ७६ आज सकाळी ११.१० पासून १.३० पर्यत न्यायालयासमक्ष हजर आहे. आरोपी क्र.१ याचा दुपारी १.३० पर्यत वारंवार पुकारा करता गैरहजर. आरोपीचे वकील श्री.पी.ए.तांबोळी व श्री.एन.व्ही.पवार यांचा पुकारा दुपारी १.३० पर्यत करता गैरहजर. आरोपीतर्फे के.पी.वर्मा वकीलांनी दुपारी १.३० वाजता श्री.एन.व्ही.पवार या वकीलांना बोलविणे पाठविल्यानंतर गैरहजेरीचा अर्ज दिलेला आहे. परंतु सदर अर्जात गैरहजेरीबाबत वाद नसल्याचा कोणताही मजकुर नमुद केलेला नाही. आरोपी क्र.१ हा न्यायालयासमक्ष हजर राहत नाही. आरोपीने नियुक्त केलेले वकील यांना सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिशानिर्देशाप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने घातलेल्या अटींनुसार आठवडयातील दोन दिवस ठेवण्यात येते याची माहिती आहे. परंतु ते चालविणेकामी अर्ज सुध्दा या न्यायालसमक्ष दुपारी १.३० पर्यत येत नाही. आरोपी क्र.१ याने या न्यायालयासमक्ष आभासी तंत्रज्ञानाद्वारे हजर राहण्याचा अर्ज दिला, परंतु मा.उच्च न्यायालयाचे परीपत्रकाप्रमाणे कोणतीही माहिती सदर अर्जासोबत दिली नाही व सदर अर्जावर युक्तीवाद करण्यास आरोपी गैरहजर आहे. आरोपीतर्फे कायमस्वरुपी गैरहजेरीचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

२. सदरचे प्रकरण सन २००२ पासून प्रलंबित आहे. साक्षीदार हजर असतांना आरोपी न्यायालयात हजर नसतो परंतु त्याचे गैरहजेरीचे अर्ज त्या नमुद केलेल्या कारणाचे विश्लेषण बघून मंजुर केले जातात व तपास अधिकारी यांचा पुरावा नोंदविला जातो. त्यामूळे गैरहजेरीची कायमस्वरुपी माफी सदर प्रकरण पुढे चालावे या कारणाने वेळोवेळी दिलेले अर्ज मंजुर करुन प्रकरण चालवत आहे. तेव्हा कायमस्वरुपी गैरहजेरी माफी दिल्यास या न्यायालयात आरोपी क्र.१ हजर राहणार नाही व त्यामूळे सदर प्रकरण हे पुढे चालविणे हे न्यायालयास शक्य होणार नाही कारण आरोपी हा सदर प्रकरणे चालविणे कामी केवळ प्रकरण प्रलंबित कसे राहील हा हेतू ठेवून दर तारखेत वेगवेगळे अर्ज दाखल करून प्रकरण

प्रलंबित ठेवतो. त्यामूळे सदर प्रकरणातील तपास अधिकारी वय वर्ष ७६ हे न्यायालयासमक्ष तब्ब्ल २५ वर्षांनी पुरावा देणे कामी हजर झाले आहे. त्यांची शारीरीक परीस्थीती साक्षीदाराच्या पिंज–यात सलग एक तास उभे राहून पुरावा देण्याची दिसून येत नाही. त्यामूळे प्रकरणातील त्यांचा पुरावा हा टप्प्या टप्प्याने नोंदविण्यात येत आहे. परंतु आज १.३० पर्यत सदर प्रकरणात कोणताही अर्ज व आरोपी क्र.१ न्यायालयासमक्ष हजर नाही. तेव्हा आरोपी क्र.१ यांस आजच शेवटची संधी म्हणून त्याचा अर्ज आल्यास मंजुर करता येईल अन्यथा त्याचे विरुध्द योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

MRUNAL YASHWANT DOIPHODE

Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.07.23 17:31:57 +0530

वर्धा. ( श्रीमती एम.वाय.डोईफोडे )

दि.२३.०७.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा.

## आदेश नि.क्र.१ वर.

## (दि.२३.०७.२०२६)

सदर प्रकरणातील तपास अधिकारी वय वर्ष ७६ न्यायालयासमक्ष दुपारी २.०० वाजेपर्यत हजर. आरोपी क्र.१ दुपारी ३.०५ पर्यत गैरहजर. गैरहजेरीचा अर्ज ३.०५ वाजता दाखल. आरोपी याने ०३.०५ पर्यत गैरहजेरीचा अर्ज तसेच तहकुबीचा अर्ज देण्याची तसदी घेतली नाही. तपास अधिकारी यांचा पुरावा नोंदविणे कामी आरोपी क्र.१ ची हजेरी न्यायालयासमक्ष असणे गरजेचे आहे कारण आरोपीस नैसर्गिक न्यायतत्वाचे पालन करुन त्याचे हजेरी साक्ष नोंदविणे आवश्यक आहे. परंतु आरोपी यास सदर प्रकरण केवळ प्रलंबित करणे असल्यामूळे आरोपी हा साक्षीदार हजर होवूनही न्यायालयासमक्ष हजर राहत नाही. तसेच गैरहजेरीचा व तहकुबीचा अर्ज दाखल करीत नाही. आज दाखल केलेला अर्ज हा दुपारी ३.०५ वाजा दाखल केला असून तपास अधिकारी ज्येष्ठ नागरीक असल्यामूळे ते न्यायालयासमक्ष सकाळी ११.१० पासून २.०० पर्यत हजर होते आणि दुस-या सत्रात ते त्यांचे वैयक्तीक कारणाने न्यायालयासमक्ष हजर नाहीत. अश्या परीस्थीतीत न्यायालयाची कुचंबना की जेणेकरुन प्रकरण हे लवकरात लवकर निकाली काढणे आहे. परंतु आरोपी क्र.१ त्यास सहकार्य करीत नाही तेव्हा आज आरोपीने दिलेला गैरहजेरीचा अर्ज फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २०५ अन्वये शेवटची संधी म्हणून मंजुर करण्यात आला. याची नोंद आरोपी व त्यांचे वकीलांनी घ्यावी व पुढील तारखेस हजर न राहिल्यास योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

MRUNAL YASHWANT DOIPHODE

Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.07.23 17:32:04 +0530

वर्धा. ( श्रीमती एम.वाय.डोईफोडे )

दि.२३.०७.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा.